दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा

रविवार, दि. १२ जुलै २०२६



# विवेकानंद महाविद्यालयात रील मेकिंग स्पर्धेला प्रतिसाद

- संजना पाटील हिने पटकावला प्रथम क्रमांक : समृद्धी चौगुले द्वितीय
- तृतीय क्रमांक ऋषित प्रसाद आणि अदिती असवले यांना विभागून

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद महाविद्यालय येथील अर्थशास्त्र विभाग आणि शिवाजी यूनिवर्सिटी इकानॉमिक्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्तरील मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले. लोकसंख्या,शाश्वत विकास आणि जनजागृती या विषयांवर विद्यार्थ्यांनी सर्जनशील व माहितीपूर्ण रील्स सादर करून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

स्पर्धेचे परीक्षण समाजशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विजय मस्के तसेच पी. व्ही. पी. महाविद्यालय, कवठेमहांकाळ येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. किरण सकट यांनी केले. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास पाटील होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी वाढती लोकसंख्या, संसाधनांचा योग्य वापर आणि युवकांची सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी सदस्या डॉ. संपदा टिपकुर्ले होत्या. आयोजनासाठी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांचे मार्गदर्शन लाभले. स्वागत आणि प्रास्ताविक प्रा. ए. बी. वसेकर यांनी केले. सूत्रसंचालन साक्षी क्षीरसागर हिने तर प्रा. नयना पाटील यांनी आभार मानले. डॉ. संदीप पाटील तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**स्पर्धेचा निकाल अनुक्रमे :** संजना पाटील, समृद्धी चौगुले, तर तृतीय क्रमांक ऋषित प्रसाद आणि अदिती असवले यांना विभागून देण्यात आला तर अभिषेक जाधव याने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला.

पुढारी संमिश्र रविवार, १२ जुलै २०२६

# विवेकानंद महाविद्यालयांतील रील मेकिंग स्पर्धेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय अर्थशास्त्र विभाग आणि शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त रील मेकिंग स्पर्धा झाली. लोकसंख्या, शाश्वत विकास आणि जनजागृती विषयांवरील विद्यार्थ्यांच्या रील्सना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अध्यक्षस्थानी डॉ. कैलास पाटील होते. प्रमुख अतिथी डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी सामाजिक जनजागृतीसाठी डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. स्पर्धेत संजना पाटीलं हिने प्रथम, समृद्धी चौगुलेने द्वितीय, ऋषित प्रसाद व अदिती अस्वले यांनी संयुक्त तृतीय क्रमांक मिळवला. अभिषेक जाधवने चतुर्थ क्रमांक मिळवला. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.